नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २९/०८/२०२६ (शनिवार )

.................................................................................................

## मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांनी घेतली नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांच्या कामकाजाची तसेच आगामी सणोत्साबाबत आढावा बैठक
## नागपुर ग्रामीण पोलीसांचे केले कौतुक

आज दिनांक २९/०८/२०२६ रोजी मा. श्रीमती मनीषा पाटणकर — म्हैसकर, अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र राज्य यांनी पोलीस भवन नागपुर येथे नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांच्या कामकाजाबाबत तसेच आगामी सणोत्सवाबाबत आढावा बैठक घेतली. सदर बैठकीस मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी आणि सर्व शाखा प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीत मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (**CEO**), **MARVEL** यांनी मा. श्रीमती मनीषा पाटणकर — म्हैसकर, अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र राज्य यांच्या समक्ष 'तपास सारथी' या अभिनव उपक्रमाचे सादरीकरण केले. मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून साकारत असलेल्या 'तपास सारथी' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची **MARVEL – Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement** या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपक्रमांतर्गत विकसित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. हा अभिनव उपक्रम नागपूर ग्रामीण जिल्हयात निर्मित करण्यात येत आहे. 'तपास सारथी' प्रणालीची संकल्पना, कार्यपद्धती, तांत्रिक वैशिष्ट्ये तसेच तपास प्रक्रियेत होणारे संभाव्य फायदे याबाबत माहिती देण्यात आली.

१) Complaint registration using voice and filling IIF forms मध्ये आवाजाच्या माध्यमातून तक्रार नोंदविणे फॉर्म स्वयंचलितपणे भरून घेणे,

२) Investigation Co-Pilot च्या माध्यमातून तपास अधिकाऱ्यांना मार्गदर्शन,

३) Chain of Custody of evidence of digital evidence on blockchain च्या माध्यमातून डिजिटल पुराव्यांचे ताबा व हस्तांतरणाची साखळी चे ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे सुरक्षित व्यवस्थापन


४) Chain of Custody of tangible evidence on blockchain च्या माध्यमातून भौतिक पुराव्यांचा ताबा व हस्तांतरणाची साखळी चे ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे सुरक्षित व्यवस्थापन

५) AI Chargesheet Scrutiny च्या माध्यमातून दोषारोपपत्र सादर करण्यापूर्वी पडताळणी केली जाणार आहे.

**सध्या प्रथम खबरी अहवाल (FIR) नोंदविण्यास साधारणत १ ते २ तासांचा कालावधी लागतो. 'तपास सारथी' प्रणालीच्या माध्यमातून ही प्रक्रिया अधिक सुलभ, अचूक आणि गतिमान होऊन सुमारे ३० मिनिटांत FIR नोंदविणे शक्य होणार आहे. या अभिनव व तंत्रज्ञानाधारित उपक्रमाची माहिती जाणून घेतल्यानंतर मा. अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र राज्य यांनी 'तपास सारथी' उपक्रमाचे विशेष कौतुक केले तसेच अभिनंदन केले.**


**सणोत्सव बंदोबस्त/ उपाययोजनेंबाबत आढावा:— मा. अपर मुख्य सचिव (गृह)** यांनी आगामी येणाऱ्या जन्माष्टमी, गोपाळकाला, पोळा, गणेश, चतुर्थी(स्थापणा), अनंत चर्तुदशी (विर्सजन) या सणोत्सवाच्या कालावधीमध्ये कायदा व सुव्यवस्थेबाबत उपाययोजनेंचा आढावा घेतला.

**गुन्हेगांरी नियंत्रण :—** नागपूर ग्रामीण जिल्हयामध्ये जुलै सन २०२५ च्या तुलनेत जुलै सन २०२६ मध्ये खुनाच्या गुन्हयांमध्ये ४१.४ टक्के, चोरीच्या गुन्हयांमध्ये १७.३ टक्के मारहाणीच्या गुन्हयांमध्ये १८.१ टक्के आणि विनयभंगाच्या गुन्हयांमध्ये २०.५ टक्के घट नोंदविण्यात आली आहे. तसेच खुनाचा प्रयत्न, अपहरण यांसह विविध प्रकारच्या गुन्हयांमध्येही लक्षणीय घट झाली असुन एकुण गुन्हयांमध्ये १८.५ टक्क्यांनी घट झाली आहे.




**सायबर गुन्हयांमध्ये प्रभावी कारवाई :—** मा. पंतप्रधान, भारत यांच्या अध्यक्षतेखाली घेतल्या गेलेल्या प्रगती PRAGATI ( Pro And Active Governance and Timely Implementation ) **या उच्चस्तरीय बैठकीच्या पार्श्वभूमीवर** नागपुर ग्रामीण जिल्ह्यात सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सायबर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असलेल्या कारवाईत १) म्युल बँक खातेदारांविरुद्ध कारवाई ,२) पीडित नागरिकांचे पैसे परत Money Restoration Module (MRM) ,३) (Sahyog Portal) द्वारे आक्षेपार्ह मजकूर डिलीट करणे, यासह अनेक मृद्दयांवर नागपुर ग्रामीण पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

## Exceptional Performance in Pragati for Cyber Crime






| Sr. No | Month | Rank |
|---|---|---|
| 1 | E-Zero Fir | 2 |
| 2 | MRM | 3 |
| 3 | GRM | 6 |
| 4 | SAHYOG | 1 |
| 5 | CIAR (SAMANVAY) | 3 |
| 6 | Cyber Hotspots | 5 |

**मोक्का कारवाई व जेल रिलीज आरोपींवरील प्रतिबंधात्मक कारवाई :—** गंभीर व संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांनी **मोक्का (MCOCA)** कायद्यान्वये कारवाईला विशेष गती दिली असून, सन २०२६ मध्ये धोकादायक व्यक्ती, अवैध शस्त्र, अंमली पादार्थ ,वाहन चोरी, रेती चोरी, गोवंश तस्करी,मालमत्तेविरूध्द गुन्हे अशा गुन्हयामध्ये १२ मोक्का अन्वये आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. तसेच जेलमधून सुटका झालेल्या सराईत आरोपींवरही बारकाईने लक्ष ठेवून कलम १२६ भा.ना.सु.सं अन्वये ११९२ प्रतिबंधात्मक कारवाया, कलम १२९ भा.ना.सु.सं अन्वये ११९३, बंधपत्र रद्द प्रकरणे एकुण ११६,बंधपत्र रद्द प्रकरणात मा.अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या **कडुन १० लाख ८३ हजार ५०० रूपयांचा** दंड आकारण्यात आला. बंधपत्र रद्द प्रकरणात ३ आरोपींना कारागृहात दाखल करण्यात आले. गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी MPDA अंतर्गत एकूण १९ प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या असून, त्यामध्य धोकादायक व्यक्ती, दारूबंदी, जुगार, प्राणी अत्याचार, वाळू चोरी आणि अमली पदार्थांशी संबंधित प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली आहे.तसेच दर मंगळवारी आणि शुक्रवार जिल्हयातील अभिलेखावरील आरोपींची **आरोपी परेड** घेण्यात येते.

त्यामुळे संभाव्य गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी प्रतिबंधात्मक पोलीसिंग अधिक प्रभावी करण्यात आले आहे. **गोवंशीय जनावरांची कत्तलीच्या उद्देशाने तस्करी व अवैध वाहतूक करणाऱ्या संघटित टोळीविरुद्ध मोक्का (MCOCA) अंतर्गत कारवाई करणारा नागपूर ग्रामीण हा महाराष्ट्रातील पहिले घटक असुन या संघटित गुन्हेगारीविरोधात करण्यात**

आलेल्या या अभिनव व प्रभावी कारवाईबद्दल मा. अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र राज्य यांनी नागपूर ग्रामीण पोलिसांचे विशेष कौतुक केले.







**नवीन कायद्याचा प्रभावी वापर**

भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १११ चा प्रभावी वापर करत नागपूर ग्रामीण पोलिसांनी संघटित व गंभीर स्वरूपाच्या गुन्हयांमध्ये सामिल आरोपींवर कठोर कारवाई केली आहे. सन २०२६ मध्ये २८ ऑगस्टपर्यंत कलम १११ भान्यासं अंतर्गत ११ गुन्हे दाखल असुन यामध्ये चोरी , बेकायदेशीर जनावरांची वाहतूक, दरोडा, अंमली पदार्थ आणि प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु अशा गुन्ह्यांचा समावेश आहे. तसेच भारतीय न्याय संहिता (भान्यासं), २०२३ मधील कलम ११२ चा प्रभावी वापर करत २०२४ ते सन २०२६ पर्यंत कलम ११२ भान्यासं अंतर्गत एकूण ८१ गुन्हे दाखल करण्यात आले असुन यामध्ये जुगाराचे , अवैध दारू विक्रीचे , आणि चोरीचे गुन्ह समाविष्ट आहे. नवीन

कायद्यांचा योग्य व प्रभावी वापर करून गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांची प्रभावी कामगिरी आहे.




## CRIME STATISTICS SUMMARY: SECTION 112 BNS ACTIONS (2024-2026)

Data based on summary for Parshivni Police Station, categorized by offense type and year. (Note: 2026 data up to 27.08.2026)

**Detailed Offense Breakdown (Cases per Year)**

| Offense Category | 2024 | 2025 | 2026 | Total |
|---|---|---|---|---|
| Offenses Against Human Body | 0 | 4 | 0 | 4 |
| Cruel Transportation of Animals | 0 | 1 | 0 | 1 |
| Theft | 1 | 2 | 1 | 4 |
| Gambling | 1 | 53 | 15 | 69 |
| Illegal Liquor Sales | 0 | 1 | 2 | 3 |
| **YEARLY TOTALS** | **2** | **61** | **18** | **81** |


**Key Note:**
**Major Gambling Bust**

**C.R. No.:** 40/24
(Parshivni Police Station)

**Offense:**
Mumbai Gambling Act & Section 112 BNS


**Action Taken:**
5-Day Police Custody Remand (PCR) for 5 Accused Individuals.

**रस्ते अपघातात लक्षणीय घट :—** जानेवारी ते जुलै २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नागपूर ग्रामीणचा सातत्याने पहिल्या पाच जिल्हयामध्ये समावेश असुन सातत्यपूर्ण व परिणामकारक रस्ते सुरक्षा उपाययोजनांमुळे सन २०२६ मध्ये रस्ते अपघातातील मृत्यूंच्या संख्येत २२ टक्के, तर एकूण रस्ते अपघातांमध्ये २३ टक्के घट नोंदविण्यात आली आहे. रस्ते अपघातांमध्ये आणखी प्रभावीपणे घट करण्यासाठी SaveLIFE Foundation यांच्या तांत्रिक सहकार्याने जुलै २०२६ पासून राबविण्यात येणाऱ्या Dynamic Enforcement Action Plan या अभिनव उपक्रमाचे सुध्दा **मा. अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र राज्य यांनी नागपूर ग्रामीण पोलिसांचे विशेष कौतुक केले.**




**Dial ११२ कामगिरी** :— Dial ११२ सेवेमध्ये प्रतिसादाचा वेग लक्षणीयरीत्या सुधारला असून, एकूण प्रतिसाद वेळ जुलै २०२६ मध्ये ६ मिनिटे ०५ सेकंदांवर आला आहे.

मागिल सहा महीन्यात नागपुर ग्रामीण पोलीस दलाचा हे सातत्याने पहील्या १० घटकांमध्ये समावेश आहे.




**GPS प्रणालीद्वारे प्रभावी पेट्रोलिंग** :— नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या वाहनांना GPS Tracking System जोडण्यात आले असून, पोलीस वाहनांच्या हालचालींचे Live Monitoring केले जात आहे. या प्रणालीच्या माध्यमातून पेट्रोलिंग करणाऱ्या वाहनांचे स्थान, मार्ग, थांबे व कव्हर केलेले अंतर यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्रभावी देखरेख ठेवली जाते.यामुळे गुन्हेप्रवण व संवेदनशील भागांमध्ये पोलीस बंदोबस्ताचे नियोजन अधिक अचूकपणे करता येत असून, पेट्रोलिंगची कार्यक्षमता व पोलिसांची तत्परता वाढण्यास मदत झाली आहे.

**मा. अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र राज्य यांनी नागपूर ग्रामीण पोलिसांचे विशेष कौतुक केले. नागपूर ग्रामीण पोलिसांच्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करून, याच पद्धतीने सातत्यपूर्ण व प्रभावी कामगिरी पुढेही सुरू ठेवण्याच्या सूचना दिल्या.**


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
पोलीस


महाराष्ट्र पोलीस
पोलीस अधीक्षक
नागपूर ग्रामीण


महाराष्ट्र पोलीस
पोलीस अधीक्षक
नागपूर ग्रामीण


पोलीस अधीक्षक
नागपूर ग्रामीण



# सावनेर शहरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे सुरू असल्याबाबत

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २६/०८/२०२६ रोजी चे एका वृत्तपत्रात सावनेर शहरातील २३ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याबाबत बातमी प्रसिद्ध झालेली आहे. सदर बातमीबाबत सविस्तर वस्तुस्थिती अशी आहे की, **सावनेर शहरातील विविध महत्त्वाच्या व संवेदनशील ठिकाणी बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे परिसरावर देखरेख ठेवण्यात येत असून, सर्व ८७ कॅमेरे कार्यरत स्थितीत असुन सुरू आहेत.**



# पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत दाखल गुन्हयातील वन्यजीव अवयव जप्ती प्रकरणी उमरेड पोलीसांनी वन विभागास केला पत्रव्यवहार

पोलीस स्टेशन उमरेड :— दिनांक २६/०८/२०२६ रोजी **पोलीस स्टेशन उमरेड येथे बनावट नोटा तयार करून देतो असे सांगुन फसवणुक करणारे तसेच वन्यजीव अवयव आणि अंमली पदार्थ बाळगणाऱ्या आरोपींवर कारवाई केली आहे.** उमरेड पोलीस स्टेशन येथे आरोपी क्रं **१) कुलदीप धनुराम कश्यप, वय ३६ वर्षे,रा. घर नं. ५, गल्ली नं. ५, भासेला कॉलनी, अरुणपुरी रोड, घरौंडा, करनाल, हरियाणा.२)मोहित नरेश कश्यप, वय २६ वर्षे,रा. डोबर कॉलनी, रामलीला ग्राउंड, पानिपत, हरियाणा., ३)गौरव राधेश्याम कश्यप, वय २५ वर्षे,रा. डोबर कॉलनी, रामलीला ग्राउंड, पानिपत, हरियाणा,४) महीला आरोपी तसेच तपासात निष्पन्न झालेला ५) अक्षय वसंतराव पाटील, रा उमरेड अप.क्र. ८५०/२०२६, कलम ३१८(४), ३(५) भान्यासं सहकलम २(१६), २(३२), २(३५), ९, ३९, ३९(इ), ४४, ५२, ५७ वन्यजीव संरक्षण अधिनियम,सह कलम १७ एनडीपीएस कायदयान्वये गुन्हा दाखल झाला असुन आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

नमुद आरोपींच्या ताब्यातुन ०१) काळविटाच्या शिंगासारखे ०१ शिंग, ०२) हरणाच्या शिंगासारखे ०१ शिंग व ०३) वाघाच्या दातांसारखे ०२ दात मिळून आले असुन सदर जप्त साहित्य वन्यजीवांशी संबंधित असल्याने, सदर गुन्ह्याची संपूर्ण माहिती उमरेड वन विभागास देण्यात आली. त्यानंतर वन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळास भेट देऊन जप्त साहित्याची पाहणी केली आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने व जप्त करण्यात आलेल्या वन्यजीवांच्या अवयवांच्या संदर्भात **वन्यजीव संरक्षण अधिनियम** अन्वये आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत उमरेड वन विभागास पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात पोलीस विभाग व वन विभाग यांच्यात समन्वय ठेवून पुढील आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

## घरफोडीचा गुन्हा उघड
## १५ हजारांचा मुद्द्देमाल मुद्द्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने दिनांक २८/०८/२०२६ रोजी जलालखेडा पोलीस स्टेशन येथे दाखल १ घरफोडीचा गुन्हा उघड करून १५०००/— रूपयांचा मुद्द्देमाल जप्त केला आहे. सदर प्रकरणी तपासात विधीसंघर्ष बालकाला निष्पन्न केले आहे.**

दिनांक २८/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक काटोल उपविभागात उघड न झालेल्या गुन्हयांचा तपास करीत असतांना पोलीस स्टेशन जलालखेडा अप. क्र. ४३८/२०२६ कलम ३३१(४), ३०५(अं) भा.न्या.सं सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे घरफोडी गुन्हे करणारा विधीसंघर्ष बालक यास निष्पन्न करून त्यास ताब्यात घेतले. नमुद विधीसंघर्षग्रस्त बालकाकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने पोलीस स्टेशन जलालखेडा परिसरात घरफोडी केल्याचे कबुल केले आहे.

**पोलीसांनी पंचासमक्ष एक मोटोरोला कंपनीचा अँड्रॉइड मोबाईल किंमती १५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपास जलालखेडा पोलीस करीत आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १८ गुन्हे नोंद

**दिनांक २८/०८/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांकडून अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक तसेच सेवन करणाऱ्यांविरूद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण १८ गुन्हे दाखल करण्यात आले**

**पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी १) रामकुमार दयाराम मोहनकर, वय ४९ वर्ष, रा. वग, ता. कुही, जि. नागपूर २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२

गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड येथे** आरोपी नामे मुकेश मोरेश्वर मेश्राम, वय ४० वर्ष, रा. जोगीठाणा पेठ नायडु बाजार उमरेड, ता. उमरेड, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे १) संजय रूषी बारेकर, वय ४५ वर्ष, रा. खोलडोडा, ता. भिवापूर, जि. नागपूर २) परसराम मोतीराम चाचेरकर, वय ७२ वर्ष, रा. नाद, ता. भिवापूर, जि. नागपूर ३) कवडुजी रामप्रसाद पवार, वय ७५ वर्ष, रा. वासी, ता. भिवापूर, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार येथे** आरोपी १) नरेश शंकर मरस्कोल्हे, वय ३२ वर्ष, रा. सावंगी ता. रामटेक २) आनंद मुन्सी भलावी, वय ५७ वर्ष, रा. देवरी, पो. गोरेघाट मेदकेपार, जि. बालाघाट म.प्र. यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, तसेच ३) चिंदु जोदु कोवाचे, वय ४५ वर्ष, रा. वनपवनी, ता. रामटेक २) बापूराव भाकरू वरठी, वय ६० वर्ष, रा. सावंगी, ता. रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद, आरोपी १) रतन हिरदेशी भलावी, वय ६३ वर्ष, दोन्ही रा. वनपवनी, ता. रामटेक २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी येथे** आरोपी देवेंद्र देवरावजी पिंपळकर, वय ४० वर्ष, वार्ड नं. ०१, टेंभरी रामा, पोस्टे बेला जि. नागपूर २) नामदेव देवराव मरकाम, वय ७३ वर्ष, रा. तुमडी, ता. जि. नागपुर ३) ज्ञानेश्वर सोमाजी मसराम, वय ५० वर्ष, रा. खापरी, ता. उमरेड, जि. नागपूर ४) शंकर कवडुजी पारसे, वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र. २, बुट्टीबोरी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** आरोपी विलास सुखदेव आखरे, वय ३४ वर्ष, रा. खंडाळा, ता. नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे** आरोपी १) दिलदारसिंग उर्फ दिल्लु मायासिंग भादा, वय ४६ वर्ष, रा. गुरूद्वारा जवळ, वार्ड क्र. १५, कळमेश्वर २) महिला आरोपी प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर येथे** आरोपी किशोर निळकंठ वरठी, वय ४५ वर्ष, रा. वार्ड नं. १७, पहिलेपार सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १०५३० मिली देशी दारू, ८५ लिटर मोहाफुल दारू तसेच वाहन असा एकुण १३१८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७०५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २९/०८/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७०५आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३१ आरोपी अशा एकुण ९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५६ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १६ आरोपी अशा एकुण १५१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १५ आरोपी अशा एकुण ७२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २६ आरोपी अशा एकुण ११० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४९ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २४ आरोपी अशा एकुण १४६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.









जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण),